Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

ज्ञानप्रबोधिनी विद्यालयात दातृत्वाचा प्रेरणादायी उपक्रम

(पान २ वर)



। शुक्रवार, दि. ०३ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ८५ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

### आयसीएसई शाळांच्या एनओसीचे नियम कठोर

मुंबई: सीबीएसई, आसीएसई, आयबी तसेच अन्य खासगी बोर्डाच्या शाळांकडून मनमानी केली जाते. पालकांना महागडी पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती करण्यात येत आहे. अशाप्रकारे अवाजवी शुल्क आकारून सरकारच्या आदेशांचे उल्लंघन होत असल्याबाबत विधान परीषदेत सर्वपक्षीय सदस्यांनी आक्षेप नोंदवला. यावर सरकारकडून उत्तर देताना राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या शाळांना मान्यता केंद्र सरकार देते. मात्र त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) राज्य सरकारकडून दिले जाते. आयबी शाळांकडून विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकान, विक्रेते आणि वितरण केंद्रांमधून वह्या-पुस्तके खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याबाबत सुधाकर अडबाले यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना मंत्री पंकज भोयर यांनी विद्यार्थी आणि पालकांना शैक्षणिक साहित्याच्या नावाखाली सक्ती करणाऱ्या शाळांवर कारवाई केली जाईल.

## महिला शेतकऱ्यांना मोठा अधिकार! 'विनासातबारा' शेतकरी प्रमाणपत्राचा मार्ग मोकळा

# महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक मंजूर!

## शेती, पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालनातील महिलांनाही मिळणार शेतकरी दर्जा

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । राज्यातील लाखो महिलांसाठी ऐतिहासिक ठरणारा निर्णय गुरुवारी महाराष्ट्र विधानसभेत घेण्यात आला. शेती आणि शेतीपूरक व्यवसायात कार्यरत असलेल्या महिलांना अधिकृतपणे 'शेतकरी' म्हणून मान्यता देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.**

या विधेयकामुळे महिलांच्या नावावर सातबारा नसला तरी त्यांना शेतकरी प्रमाणपत्र मिळणार असून शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.विधेयकावर उत्तर देताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले की, या कायद्याचा उद्देश महिलांच्या नावावर जमीन हस्तांतरित करणे नसून, प्रत्यक्ष शेती किंवा शेतीशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख आणि अधिकार मिळवून देणे हा आहे. राज्यातील केवळ १५ ते २० टक्के महिलांची नावे सातबारावर असल्याने उर्वरित महिलांना



शेतकरी म्हणून शासनमान्यता मिळत नव्हती. हा अन्याय दूर करण्यासाठी हे विधेयक महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कायद्याअंतर्गत शेतीबरोबरच पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन तसेच इतर कृषी संलग्न व्यवसायात कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता दिली जाणार आहे. त्यामुळे अशा महिलांना राज्य आणि केंद्र शासनाच्या कृषी योजनांमध्ये सहभागी होता येणार असून विविध आर्थिक सवलती, प्रशिक्षण, अनुदान आणि इतर सुविधांचा लाभ मिळणार आहे.विधेयकावरील चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांनी स्वागत करत काही महत्त्वाच्या सूचना मांडल्या. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे आमदार कैलास पाटील यांनी राज्याबाहेरील महिलांना या कायद्याचा गैरफायदा मिळू नये, अशी चिंता व्यक्त केली. त्यावर कृषिमंत्री भरणे यांनी स्पष्ट केले की, राज्याबाहेरील महिलांना शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार नाही. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे आमदार भास्कर जाधव यांनी महिलांच्या नावावर किमान अर्धा एकर जमीन नसताना त्यांना शेतकरी म्हणून मान्यता कशी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे जयंत पाटील यांनी पतीच्या नावावरील किमान ५० टक्के जमीन महिलांच्या नावे करण्याची मागणी करत, महिला शेतकऱ्यांना विनातारण कर्ज मिळणार का, याबाबतही सरकारकडून स्पष्टीकरण मागितले.

### विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी

ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर सहाय्यक कृषी अधिकाऱ्याकडून महिलांना शेतकरी प्रमाणपत्र दिले जाईल. महिलांना शेतीतील स्वतंत्र ओळख, शासनाच्या योजनांमध्ये थेट सहभाग आणि आर्थिक सक्षमीकरणाचा नवा मार्ग उपलब्ध करून देणारे हे विधेयक राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. विशेषतः सातबारा नसलेल्या लाखो महिलांना प्रथमच अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता मिळणार असल्याने या निर्णयाचे राज्यभरातून स्वागत होत आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## आषाढी एकादशीनिमित्त उधना–पंढरपूर विशेष रेल्वे

### वारकरी-प्रवाशांना मोठा दिलासा




**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी:** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी व भाविकांसाठी पश्चिम रेल्वेने उधना–मिरज–पंढरपूर विशेष रेल्वेगाडी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे या रेल्वेला पाळधी रेल्वे स्थानकावर थांबा मंजूर करण्यात आल्याने धरणगाव तालुक्यासह परिसरातील हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. धरणगाव तालुका प्रवासी मंडळाची सातत्यपूर्ण मागणी आणि जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सौ. स्मिताताई उदय वाघ यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. पश्चिम रेल्वेकडून सुरू करण्यात येणारी ही विशेष रेल्वे एकूण दोन फेऱ्या करणार असून, आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या वाढत्या गर्दीचा विचार करून ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित रेल्वेगाड्यांवरील ताण कमी होण्यास मदत होणार असून वारकऱ्यांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे. या निर्णयामागे धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. दि. २१ मे रोजी मुंबई सेंट्रल येथे झालेल्या डी.आर.यू.सी.सी. (DRUCC) बैठकीत सदस्य महेंद्र कोठारी यांनी मागील वर्षाप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीनिमित्त विशेष रेल्वेगाडी सुरू करण्याची मागणी पश्चिम रेल्वे प्रशासनाकडे ठामपणे मांडली होती. त्यानंतर खासदार स्मिताताई उदय वाघ यांनीही पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने पाठपुरावा करून या मागणीचा आग्रह धरला. त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत पश्चिम रेल्वे प्रशासनाने विशेष रेल्वे सुरू करण्यास मंजुरी दिली.

## मिलिंद नगरात गटारीचे सांडपाणी रस्त्यावर; नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

### तातडीने निचऱ्याची व्यवस्था न केल्यास नागरिक रस्त्यावर उतरणार – सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक

**जन सम्राट टाईम्स**

**जामखेड | प्रतिनिधी:** जामखेड शहरातील प्रभाग क्रमांक ६ अंतर्गत असलेल्या मिलिंद नगर परिसरात गटारीचे पाणी व सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या समस्येकडे नगरपरिषद प्रशासन व स्थानिक नगरसेवक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.निवेदनानुसार, मिलिंद नगरातील कांबळे किराणा ते संजय वाघमारे यांच्या घरापर्यंतच्या परिसरातील अंडरग्राऊंड गटार तुंबल्यामुळे सांडपाण्याचा निचरा



पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी गटारीचे दूषित पाणी थेट रस्त्यावर वाहत असून संपूर्ण परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरली आहे. पावसाळ्यामुळे ही परिस्थिती आणखी गंभीर बनली असून नागरिकांना दैनंदिन वावर करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिसरात लहान मुलांची संख्या मोठी असून ते रस्त्यावर खेळत असतात. डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया तसेच तापासारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. नागरिकांचा आरोप आहे की, नगरपरिषदेकडून नियमित गटारसफाई केली जात नाही. सफाई कर्मचाऱ्यांकडूनही या भागाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्यामुळे समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. अनेकवेळा तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करून तातडीने गटारांची स्वच्छता, सांडपाण्याचा निचरा आणि परिसरात आवश्यक आरोग्यविषयक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक यांच्यासह कांताबाई अंकुश गायकवाड, दीपाली अनिल वाघमारे, संजय राजाराम भोसले, संतोष लक्ष्मण डाडर, उमेश गायकवाड, संजय वाघमारे, पूनम अशोक कांबळे, राधा जाधव, मयूर जाधव, नितीन राऊत, सरस्वती गायकवाड, अक्षय गायकवाड, राजेंद्र गायकवाड, कृष्णा साळवे आदी नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बोदवड नगरपंचायत हद्दीतील साईनगरच्या रस्त्याची तातडीने दुरुस्तीची मागणी!

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ, प्रतिनिधी :** बोदवड नगरपंचायत हद्दीतील गट क्रमांक ३०, साईनगर येथील रस्ता पूर्णपणे काळ्या मातीचा असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखल होत आहे. परिणामी शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, चिखलामुळे रस्त्यावरून पायी



चालणेही कठीण झाले असून अनेकदा घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या समस्येबाबत नगरपंचायतीकडे अनेक वेळा तोंडी आणि लेखी तक्रारी करण्यात आल्या. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाकडे गट क्रमांक ३०, साईनगर येथील रस्त्याची तातडीने स्थळ पाहणी करून कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीट किंवा डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे. तसेच कायमस्वरूपी काम पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कडक मुरूम व खडी टाकून रोलरद्वारे दाबणी करून रस्ता वाहतुकीयोग्य करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष न दिल्यास साईनगरमधील रहिवासी तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## 'इंडियन करन्सी' रिल्सच्या आमिषाने लुटणारी टोळी जेरबंद

### धुळे तालुका पोलिसांची मोठी कारवाई




**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी :** इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारख्या समाजमाध्यमांचा गैरवापर करून "इंडियन सेकंड करन्सी", "एक लाखाचे सात लाख", "दोन लाखाचे पंधरा लाख" अशा आकर्षक आमिषांच्या रिल्सद्वारे नागरिकांना जाळ्यात ओढून त्यांची निर्जन ठिकाणी नेऊन लुटमार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात धुळे तालुका पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्या दोन साथीदारांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अजनाळे व हेकळवाडी परिसरात काही तरुणांकडून सोशल मीडियाचा वापर करून ही गुन्हेगारी टोळी कार्यरत होती. आरोपी इन्स्टाग्राम व फेसबुकवर आकर्षक रिल्स पोस्ट करून "इंडियन सेकंड करन्सी"च्या नावाखाली कमी पैशांत जास्त रक्कम मिळवून देण्याचे आमिष दाखवत होते. या आमिषाला बळी पडलेल्या व्यक्तींना संपर्क साधून व्यवहार दाखविण्याच्या बहाण्याने अजनाळे आणि हेकळवाडी परिसरातील निर्जन ठिकाणी बोलावले जात होते. तेथे पोहोचल्यानंतर आरोपींकडून संबंधितांना हत्याराचा धाक दाखवत शिवीगाळ, मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम, दागिने आणि मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतले जात होते. भीतीमुळे अनेक पीडितांनी पोलिसांकडे तक्रार करण्याचे धाडस केले नसल्याने या टोळीचे कारनामे बराच काळ सुरू असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सूत्रे वेगाने फिरविण्यात आली. या संदर्भात १० जून २०२६ रोजी धुळे तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक कैलास माळी यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून सुनिल ऊर्फ अविनाश शंकर भोसले (वय ४५) याला २७ जून रोजी ताब्यात घेतले. कसून चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली देत आणखी दोन साथीदार या लुटमारीत सहभागी असल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून तपास सुरू आहे. या कारवाईदरम्यान आरोपींकडून गुन्ह्यातील रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच या टोळीने यापूर्वी अशाच प्रकारे आणखी किती गुन्हे केले आहेत, याचाही तपास पोलीस करत आहेत.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## मानाच्या 1,400 दिंड्यांना प्रत्येकी 20 हजारांचे अनुदान

### वारकऱ्यांसाठी सरकारचा मोठा निर्णय!, वारकऱ्यांच्या सुविधा व नियोजनासाठी शासन सज्ज

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे | प्रतिनिधी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील लाखो वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. मानाच्या पालख्यांसोबत पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या १,४०० मानाच्या दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपयांचे आर्थिक अनुदान देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेसाठी २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय गुरुवारी जारी करण्यात आला.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी ही माहिती दिली. आषाढी वारीची तयारी अंतिम टप्प्यात असताना शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यभरातील वारकरी संप्रदायात



समाधानाचे वातावरण आहे. दरवर्षी लाखो वारकरी संतांच्या पालख्यांसोबत पंढरपूरच्या दिशेने पदयात्रा करत असतात. या दिंड्यांच्या व्यवस्थापनासाठी होणारा खर्च लक्षात घेऊन शासनाने आर्थिक मदतीचा निर्णय कायम ठेवला आहे. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक समतेच्या परंपरेचा अविभाज्य भाग आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या सुविधांमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने राज्य सरकार सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून २०२४ मध्ये मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची स्थापना करण्यात आली होती. या महामंडळामार्फत सलग तिसऱ्या वर्षी मानाच्या दिंड्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. यंदा राज्यातील दहा मानाच्या पालख्यांसोबत सहभागी होणाऱ्या १,४०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये अनुदान मिळणार आहे. या योजनेसाठी आवश्यक असलेला २.८० कोटी रुपयांचा निधी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने उपलब्ध करून दिला आहे. अनुदानाचे वितरण मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत करण्यात येणार असून, त्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे प्रशासकीय जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात मान्सून सक्रिय झाल्याने शेतकरी खरीप हंगामाच्या कामात व्यस्त असतानाच पंढरीच्या वारीची लगबगही सुरू झाली आहे. बुलढाणा येथून श्री संत गजानन महाराजांची पालखी मार्गस्थ झाली असून जळगाव येथून संत मुक्ताईच्या पालखीचेही प्रस्थान झाले आहे. लवकरच देहू येथून श्री संत तुकाराम महाराज आणि आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्याही पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहेत. वारीदरम्यान लाखो भाविकांची उपस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक, सुरक्षा, आपत्कालीन सेवा आणि निवास व्यवस्थेचे व्यापक नियोजन सुरू केले आहे.

### २.८० कोटींचा निधी मंजूर

विविध विभागांच्या समन्वयासाठी आढावा बैठका घेतल्या जात असून, वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. एकूण २.८० कोटींचा निधी मंजूर शासनाच्या या निर्णयामुळे दिंड्यांच्या व्यवस्थापनाचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार असून, वारकरी परंपरेच्या जतन आणि संवर्धनासाठी सरकारची बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

